सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सूचना का अधिकार

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवैशिवसं/नभाआसे/अशासकीय संस्था/अधिसूचना-१/८-अ, दिनांक: १३ जानेवारी, २०१७

## अधिसूचना

शासनाने शासन निर्णय क्र.मुमंस३३१६/प्र.क्र.३१/१६/शिक्षण-२, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये राज्यातील नक्षलग्रस्त व आदिवासी बहुल तालुक्यामध्ये/जिल्हयांमध्ये कार्यरत अशासकीय संस्थाना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने अशा भागातील मान्यताप्राप्त अशासकीय संस्थांमध्ये शासकीय /महापालिका वैद्यकीय महाविद्यालयातून पदवी, पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमदेवारांनी केलेली वैद्यकीय सेवा ही बंधपत्रित सेवा म्हणून ग्राहय धरण्यास मान्यता दिली आहे.

वरिल प्रमाणे केलेली वैद्यकीय सेवा ही बंधपत्रित सेवा म्हणून ग्राहय धरण्याच्या दृष्टीने संबंधित अशासकीय संस्थेने खालील अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यासाठी अर्जासोबत खालील कागदपत्रे दिनांक २४ जानेवारी, २०१७ पर्यंत या संचालनालयातील सीईटी सेल येथे सादर करावी.

१. अशासकीय संस्थेचे मुख्यालय व संस्था प्रमुख नक्षलग्रस्त/आदिवासी भागात कमीत कमी १० वर्षे वास्तव्य केलेले असावे याबाबतचा पुरावा.

२. आरोग्य संस्था चालविणा-या रुग्णालयांची वार्षिक बाहय रुग्णांची संख्या कमीत कमी १५००० इतकी असावी याबाबत कागदपत्रे सादर करावे.

३. बंधपत्रित उमेदवारांच्या निवासाची व्यवस्था संबंधित अशासकीय संस्थेने विनामुल्य करावी.

४. बंधपत्रित उमेदवारांचे वेतन/मानधन हे अशासकीय संस्थेने शासनाच्या नियमानुसार अदा करणे आवश्यक राहिल.

५. अशासकीय संस्थने सर्व संबंधित शासकीय यंत्रणेकडून आवश्यक त्या मान्यता प्राप्त केलेल्या असणे बंधनकारक राहिल.

६. धर्मादाय आयुक्त कार्यालयाने विहित केल्यानुसार सर्व वित्तीय व लेखापरीक्षणाच्या बाबीची पूर्तता केल्याबाबतचे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

७. धर्मादाय संस्थेच्या सर्व नियमांचे पालन करीत असल्याचे कागदपत्री पुरावा सादर करावा.

८. संबंधित अशासकीय संस्थेने शासनासोबत भागीदारीमध्ये काम केल्याचा पूर्वानुभव असल्याबाबतचे पुरावा सादर करावा.

**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**